**ठळक बातम्या**

- कसारा-मनमाड दरम्यान रेल्वेची तिसरी आणि चौथी मार्गिका, पालघर-घोटी दरम्यान महामार्गाच्या चौपदरीकरणाला केंद्रीय मंत्रीमंडळाची मंजुरी

- नैसर्गिक शेतीचा अवलंब करण्याचं बीडमध्ये महापशुधन एक्स्पो कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांचं आवाहन

- देशातल्या लांब पल्ल्यांच्या ट्रेनमध्ये आता सर्वसाधारण वर्गाच्या कोचची स्वच्छता प्रथम श्रेणी दर्जाच्या कोचप्रमाणेच केली जाईल, अशी रेल्वेमंत्र्यांची घोषणा

**आणि**

- मुलुंडमध्ये निर्माणाधीन मेट्रोच्या खांबाचा भाग कोसळून एक ठार, तीन जखमी, मुख्यमंत्र्यांकडून आर्थिक मदतीची घोषणा

**<><><><><><>**

केंद्र सरकारनं कसारा ते मनमाड दरम्यान रेल्वेची तिसरी आणि चौथी मार्गिका तसंच घोटी ते पालघर दरम्यान राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचा निर्णय घेतला आहे. केंद्रीय मंत्रिमडळानं घेतलेल्या या आणि इतर निर्णयांविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

***होल्ड... व्हीसी-***

*(केंद्रीय मंत्रिमंडळाची नवी दिल्लीतल्या साऊथ ब्लॉकमधली शेवटची बैठक काल झाली. या पुढच्या बैठका सेवा तीर्थमध्ये होणार आहे. नॉर्थ ब्लॉक आणि साऊथ ब्लॉकच रुपांतर युगे युगीन भारत या संग्रहालयात होणार असल्याची माहिती वैष्णव यांनी दिली. या बैठकीत झालेल्या निर्णयांविषयी माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत माहिती दिली. कसारा-मनमाड रेल्वे प्रकल्पाबद्दल ते म्हणाले...*

***होल्ड... बाईट- अश्विनी वैष्णव***

*राष्ट्रीय महामार्ग १६० ए च्या घोटी-त्र्यंबक-पालघर या टप्प्याचं चौपदरीकरण करण्याचा निर्णयही केंद्र सरकारनं घेतला आहे. यामुळं दिल्ली-मुंबई द्रुतगती महामार्ग आणि समृद्धी महामार्गाशी हा भाग जोडला जाणार आहे. १५४ किलोमीटर लांबीच्या या मार्गासाठी ३ हजार ३२० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.*

*1 लाख कोटी रुपयांचा अर्बन चॅलेंज फंड उभारण्याचा निर्णयही केंद्र सरकारनं घेतला आहे. १० लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांना याचा लाभ होईल. यातून शहरांचा पुनर्विकास, शहरांचं वृद्धी केंद्रांमध्ये रुपांतर, तसंच पाणी आणि स्वच्छता या समस्यांवर काम केलं जाईल. याशिवाय १० हजार कोटी रुपयांचा स्टार्टअप इंडिया फंड ऑफ फंडही केंद्र सरकार सुरू करणार आहे.)*

**<><><><><>**

रासायनिक खतांमुळे उत्पादकता कमी होत असल्यामुळे शेतकऱ्यांनी नैसर्गिक खतांचा वापर करावा, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. ते आज परळी इथं आयोजित महा पशुधन एक्स्पो २०२६ या प्रदर्शनात पशुपालकांशी संवाद साधत होते. उत्तम रोजगार निर्मिती करण्यासाठी शेतीला जोड़ व्यवसाय आवश्यक असून राज्यात शेती विकास आणि उत्पादकता वाढवण्यासाठी ५०० कोटी रुपयांची योजना राबवण्यात येत असल्याचंही त्यांनी सांगितलं. शेती पुन्हा फायदेशीर करण्यासाठी आणि पशुधन सुरक्षित करण्यासाठी वैरण विकास उपक्रम हाती घेतला जाणार असल्याची माहितीही फडणवीस यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

कर्करोग हे आज सर्वच आरोग्य यंत्रणांसमोरचं मोठे आव्हान आहे. जगात सर्वत्र कर्करोगावरच्या उपचारासाठी नवनवीन संशोधन केल्याशिवाय पर्याय नाही, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. नागपुरात कर्करोगावरच्या जागतिक परिषदेत ते बोलत होते. कर्करोग उपचार क्षेत्रात सरकारनं केलेल्या विविध उपायांची माहिती त्यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

देशातल्या लांब पल्ल्यांच्या ट्रेनमध्ये आता दर तासा-दीड तासाला स्वच्छता केली जाणार आहे. तसंच सर्वसाधारण वर्गाच्या कोचची स्वच्छताही प्रथम श्रेणी दर्जाच्या कोचप्रमाणेच केली जाईल, अशी घोषणा रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज केली. नवी दिल्ली इथं रेल्वे सुधारणांवरच्या वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. सुरुवातीला ८० ट्रेनमध्ये ही स्वच्छता मोहीम राबवली जाईल, त्यासाठी विशेष

कर्मचारी नेमण्यात येतील. शौचालयं, कचऱ्याचे डबे आणि केबिन्सची सतत स्वच्छता केली जाईल, असंही त्यांनी सांगितलं. अंथरुण, पांघरुणांचं वाटप, संकलन, पॅकिंग आणि स्वच्छतेचं काम यापूर्वी वेगवेगळ्या कंपन्यांना दिलं जात होतं, आता ते एकाच कंपनीला दिले जाईल, जेणेकरून जबाबदारी निश्चित करून कार्यक्षमता वाढवता येईल, असंही वैष्णव यांनी नमूद केलं.

<><><><><><>

आर्थिक प्रगती, उद्योग-रोजगार वाढ आणि सर्वसमावेशक विकास या तत्त्वांवर आधारित यंदाचा अर्थसंकल्प हा विकसित भारताच्या दिशेने महत्त्वाचं पाऊल असल्याची ग्वाही केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयुष गोयल यांनी आज दिली. मुंबईत भाजप प्रदेश कार्यालयात आयोजित वार्ताहर परिषदेत ते बोलत होते.

<><><><><><>

मुंबईतल्या जे. जे. रुग्णालयात पुनर्विकसित युनानी संशोधन केंद्राचं उद्घाटन केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी आज केलं. युनानी दिवस कार्यक्रम आणि युनानीमधलं संशोधन या विषयावरच्या राष्ट्रीय परिषदेला ते उपस्थित होते. १९८४ पासून सुरू असलेलं हे संशोधन केंद्र ३ कोटी ८४ लाख रुपये खर्चून अद्ययावत करण्यात आलं आहे.

<><><><><><>

सोलापूरमध्ये नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद निवडणुकीदरम्यान एका अल्पवयीन मुलाला मतदान केंद्रात प्रवेश दिल्याप्रकरणी मतदान अधिकारी आणि पोलीस शिपायाला निलंबित करण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगानं दिले आहेत. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार अर्जुन सिंह मोहिते पाटील हे आपल्या १४ वर्षाच्या मुलाला घेऊन मतदान यंत्राजवळ गेले होते. या प्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे.

<><><><><><>

मुंबईत मुलुंड इथं एल. बी. एस. मार्गावर बांधकाम सुरू असलेल्या मेट्रोच्या खांबाचा काही भाग दुपारी कोसळून एकाचा मृत्यू झाला, तर इतर तिघे जखमी झाले आहेत. आज दुपारी साडेबाराच्या सुमारास ही घटना घडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अपघाताबद्दल दुःख व्यक्त केलं असून या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. राज्य सरकार, मृताच्या वारसांना ५ लाख रुपये आर्थिक मदत देईल आणि जखमींच्या उपचाराचा खर्च करेल, असं ते म्हणाले. या घटनेची संपूर्ण चौकशी केली जाईल, असं आश्वासन त्यांनी नागपूर इथं वार्ताहरांशी बोलताना दिलं.

***होल्ड... बाईट- देवेंद्र फडणवीस***

मुंबईच्या महापौर रितू तावडे, उपमहापौर संजय घाडी यांच्यासह इतरांनी घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली. त्यानंतर त्यांनी रुग्णालयात जाऊन मृताच्या कुटुंबीयांचं सांत्वन केलं, तसंच जखमींची विचारपूस केली.

**<><><><><><>**

मुलुंड इथं मुंबई मेट्रो ४चं बांधकाम सुरू असताना खांबाचा भाग कोसळून आज झालेली दुर्घटना म्हणजे निकृष्ट कामांचं उदाहरण आहे. महायुती सरकारमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार सुरू असून, त्यामुळे राबवले जात असलेले प्रकल्प जीवघेणे ठरू लागले आहेत, असा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेची जबाबदारी घ्यायला हवी. फक्त कंत्राटदारावर कारवाई करुन हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करु नये, या घटनेची गंभीर दखल घेऊन ठोस कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.

तर, या दुर्घटनेनंतर संबंधित कंत्राटदाराला सरकार काळ्या यादीत टाकणार आहे का, असा प्रश्न शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला, मात्र अशी कारवाई होण्याची शक्यता कमीच आहे, अशी टीकाही केली. भाजपाच्या सत्ताकाळात मानवी आयुष्याला मोल राहिलेलं नाही, असंही त्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

<><><><><><>

ज्येष्ठ नेते शरद पवार यांना आज दुपारी रुग्णालयातून घरी सोडण्यात आलं. गेले काही दिवस छातीच्या संसर्गामुळे त्यांच्यावर पुण्यातल्या रुग्णालयात उपचार सुरू होते. पवार यांना पुढचे ३-४ दिवस विश्रांती घ्यायचा सल्ला डॉक्टरांनी दिल्याची माहिती त्यांच्या कन्या आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे दिली. त्यानंतर ते पुन्हा कामाला सुरुवात करतील, असंही त्यांनी सांगितलं.

<><><><><><>

अजित पवार यांच्या विमान अपघाताची सर्वसमावेशक आणि पारदर्शक पद्धतीनं चौकशी व्हावी, अशी मागणी करणारं पत्र आमदार रोहित पवार यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना लिहिलं आहे. तसंच नागरी विमान वाहतूक मंत्री के. राममोहन नायडू आणि नागरी विमान वाहतूक महासंचालनालय यांनाही ई-मेलद्वारे हे पत्र पाठवल्याची माहिती त्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे दिली. ही मागणी राजकीय नाही, तर या अपघातामागचं सत्य सर्वांसमोर यावं, या उद्देशानं हे पत्र लिहिल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

//<><><><><><>//